श्री. सुर्यकांत रामचंद्र बांदेकर वि.

श्री. प्रदिपकुमार तुकाराम बांदेकर

## निशाणी क्रमांक ६० वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.४ ते ७ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला ''कैफियत नाही'' हा आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारणेची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांच्या मते, ते प्रस्तुत कामी दाव्याच्या समन्सची बजावणी झालेनंतर हजर झाले आहे. मध्यंतरीच्या कालखंडात प्रतिवादी क्र. ४ ते ७ हे मुंबई येथे वास्तव्यास असल्याने त्यांना त्यांच्या वकीलांना वारंवार भेटून आवश्यक ती माहिती व कागदपत्रे देणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांचेविरुध्द 'कैफियत नाही' आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांना कैफियत दाखल न करण्यामागे कोणताही निष्काळजीपणा नव्हता. प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांना कायदयाचे ज्ञान नाही. प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांचेविरुध्द पारीत कैफियत नाहीचा आदेश रद्द न झालेस त्यांचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे आणि त्यांना न्यायाला मुकावे लागणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे 'कैफियत नाही' आदेश रद्द करुन कैफियत दाखल करुन घेणेची विनंती प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांनी केलेली आहे.

३. वादी यांनी नि.६८ कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी सुरुतीपासून विलंबाचे धोरण अवलंबीले आहे. वादी यांनी दाखल केलेला तुर्तातुर्त अर्जास विलंब व्हावा या हेतूने वेळेत म्हणणे दिलेले नाही. प्रतिवादी यांना वारंवार संधी देण्यात आलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचेकडे एकत्रीतपणे अखत्यारपत्र असून देखील प्रस्तुत कामी वेळेत हजर झालेले नाहीत. दाव्यास विलंब होण्याकरीता जाणुनबुजून विलंबाने दाव्यात हजर झालेले आहेत. अर्जात योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द हक्कप्रस्थापना ठराव व कायम ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.४ ते ७ यांना दाव्याचे समन्सची बजावणी झालेची दिसून येते. प्रतिवादी क्र.४ ते ७ हे सदर कामात दि.२५/०६/२०२४ रोजी हजर झालेले आहेत. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिनांक १४/०१/२०२५ रोजी दिलेला आहे. यावरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.४ ते ७ यांना

कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब प्रतिवादी क्र.४ ते ७ यांनी जाणुन बुजून केलेला नाही असे कथन केलेले आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादी क्र.४ ते ७ यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी क्र.४ ते ७ यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ आपले प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील प्रतिवादींचे कथन विचारात घेण्यास कोणतीही हरकत दिसून येत नाही. परंतु कैफियत दाखल करणेस झालेला विलंब व त्या अनुषंगाने वादीची झालेली गैरसोय योग्य तो खर्च आकारुन भरुन काढणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-:: आदेश ::-**

१. प्रतिवादी क्र.४ ते ७ यांचा नि.६० वरील अर्ज वादीस खर्चादाखल रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.४ ते ७ विरूध्द 'विना कैफियत' असा पारीत झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.४ ते ७ यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस वा तत्पूर्वी वादीस देणेची आहे. त्यानंतरच प्रतिवादी क्र.४ ते ७ यांची कैफियत अभिलेखावर नोंदविण्यात येईल.

४. प्रतिवादी क्र.४ ते ७ यांनी खर्चाची रक्कम वादीस देण्यास कसूर केल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.07.10 12:01:46 +0530

दिनांक:- ०८/०७/२०२५ (श्रीमती आर. जी. कुंभार)

ठिकाण:- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),

सावंतवाडी